| MHPA120008972019 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल तारीख | :– | २४/०९/२०१९ | | |
| | नोंदणी तारीख | :– | २४/०९/२०१९ | | |
| | निकाल तारीख | :– | १७/०७/२०२६ | | |
| | कालावधी | :– | ०६ | ०९ | २८ |
| | | | वर्षे | महिने | दिवस |

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.४७७/२०१९**

**निशाणी क्र.१३ पुढे सुरू**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | ०३/०३/२०१९ |
| खबर दाखल केल्याचा दिनांक | :– | १४/०३/२०१९ |
| दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक | :– | २४/०९/२०१९ |
| दोषारोप निश्चीत केल्याचा दिनांक | :– | २४/०६/२०२२ |
| पुरावा सुरु झाल्याचा दिनांक | :– | १९/०९/२०२३ |
| न्यायनिर्णयासाठी निश्चीत केल्याचा दिनांक | :– | १०/०६/२०२६ |
| न्यायनिर्णय घोषीत केल्याचा दिनांक | :– | १७/०७/२०२६ |
| शिक्षा देण्यात आली असल्यास, त्याचा दिनांक | :– | लागु नाही. |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नाव | अटक केल्याचा दिनांक | जामिनवर सोडल्याचा दिनांक | ठेवण्यात आलेला दोषारोप | आरोपी सिध्ददोषी किंवा दोषमुक्ती | देण्यात आलेली शिक्षा | संपरिक्षा कालावधी फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४२८ साठी आरोपीने भोगलेली स्थानबध्दता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ०१. | वैश्ववानरदेव संभाजीराव पवार | १६/०३/१९ | १६/०३/१९ | भारतीय दंड विधान, कलम २९४ | दोषमुक्ती | लागु नाही. | लागु नाही. |

## ***न्या य नि र्ण य***

*( दिनांक १७ जुलै २०२६ रोजी घोषीत )*

आरोपी विरुध्द भारतीय दंड विधान, कलम २९४ अन्वयेचा दोषारोप ठेवण्यात आलेला आहे.

[०२] संपरिक्षेदरम्यांन अभियोगपक्षाच्या वतीने एकुण सहा साक्षीदारांचा पुरावा नोंदवत, कागदोपत्री पुराव्यावर विश्वास ठेवला. त्याबाबतचा तपशील म्हणजेच साक्षीदारांचे क्रमांक, नाव, पुराव्याचे स्वरुप आणि सिध्द दस्ताऐवज इत्यांदी बाबींचे तपशीलवार वर्णन यासोबत जोडलेल्या परिशिष्टात नमुद करण्यात आलेले आहे.

[०३] आरोपीच्या विद्वान विधीज्ञांनी अभियोगपक्षाच्या साक्षीदारांना विचारलेल्या प्रश्नांवरुन आणि आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ३१३ अन्वयेच्या निवेदनातील प्रश्नांना दिलेल्या उत्तरावरुन पुर्ववैमनस्यातुन त्याच्या विरुध्द खोटा खटला दाखल केल्याचा त्याचा बचाव असल्याचे दिसुन येते.

[०४] दोन्ही बाजुचा युक्तिवाद ऐकला.

[०५] एकुणच आरोपी विरुध्द ठेवण्यात आलेला दोषारोप आणि अभियोगपक्षाच्या वतीने सादर करण्यात आलेल्या पुराव्याचा विचार करता, निर्णयापावेतो पाहोचण्यासाठी खालील मुद्दे उपस्थित होत आहेत. सदरील मुद्दयांवरील निष्कर्ष खाली दिलेल्या कारणांस्तव त्यापुढे नोंदविण्यात येत आहेत.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| **१.** | आरोपीने दिनांक ०३/०३/१९ रोजी सकाळी ११.०० वाजेच्या सुमारास पंचायत समिती कार्यालय, गंगाखेड येथील सार्वजनिक ठिकाणी अश्लील शब्द उच्चारल्याचे आणि त्यामुळे इतरांना त्रास झाल्याचे अभियोगपक्षाने सिध्द केले आहे काय ? | बिनशाबीत. |
| **२.** | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## का र ण मि मां सा

**मुद्दा क्रमांक १ व २ साठी :-**

[०६] दोन्ही बाजुच्या वतीने करण्यात आलेल्या युक्तिवादातील गुणवत्ता किंवा इतरत्र पाहण्यापूर्वी याठिकाणी हे नमुद करणे गरजेचे आहे की, प्रस्तुत मुद्दयानुषंगे अभियोगपक्षास आरोपी विरुध्द खालील घटक सिध्द करणे गरजेचे आहे. ते पुढीलप्रमाणे

- आरोपी ने अश्लील कृती किंवा अश्लील शब्द उच्चारला;
- त्याने सदर कृत्य सार्वजनिक ठिकाणी किंवा सार्वजनिक ठिकाणच्या जवळपास केले आणि
- त्याच्या सदर कृत्यामुळे इतरांना त्रास झाला.

[०७] वरनमुद घटकांपैकी पहिला घटक सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाच्या वतीने तपासण्यात आलेला साक्षीदार क्र.१ पुजाच्या पुराव्याप्रमाणे दिनांक ०३/०३/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजेच्या सुमारास ती पंचायत समिती कार्यालय, गंगाखेड येथे शिलाई मशिनच्या अर्जाची छाननी करत असतांना, आरोपी तिला "तुम्ही इथे काय काम करता, तुमचे काम बरोबर नाही, तुमचा प्रस्ताव वरिष्ठांकडे पाठवत आहे आणि तुम्हांला निलंबीत करतो" असे म्हणाला. त्याने तिला "तुझ्या आईची गांड, मायघाले" असा आई-बहिणीवरुन शिवीगाळ केला. तत्पुर्वी दिनांक २०/०८/२०१८ रोजी देखील तिने त्याला कार्यालयीन कामाबाबत त्याच्या टेबलाजवळ जावुन बोलण्याचा प्रयत्न केला असता, आरोपी तिला "मी मुतायला जाऊ की तुझ्यासमोरच मुतू का" असे बोलला होता. त्यामुळे तिने व इतर कर्मचा-यांनी त्याच्या विरुध्द दिनांक २३/०८/२०१८ रोजी गट विकास अधिकारी यांच्याकडे तक्रार केली होती. सदरची तक्रार ही महिला समितीकडे चौकशीकामी वर्ग करण्यात आली होती. त्याठिकाणी त्याने माफीनामा लिहुन दिला होता. अशा सर्व परिस्थितीत

दिनांक ०३/०३/२०१९ रोजीच्या घटनेच्या प्रकाशात तिने निशाणी क्र.१६ वरील खबर आणि निशाणी क्र.१७ वरील प्रथम खबरी अहवाल दिला होता.

[०८] अभियोगपक्षाने तपासलेल्या साक्षीदार क्र.३ कमल, साक्षीदार क्र.४ पांडुरंग आणि साक्षीदार क्र.५ प्रकाश यांनी शिव्या वगळता इतर बाबींवर साक्षीदार क्र.१ पुजाच्या पुराव्यास समर्पक असा पुरावा दिलेला आहे. अभियोगपक्षाने त्यांना घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार म्हणुन तपासलेले आहे. साक्षीदार क्र.३ कमलच्या पुराव्याप्रमाणे आरोपीने साक्षीदार क्र.१ पुजाला “तुझे आयला, मायला” असा शिवीगाळ केला होता. साक्षीदार क्र.४ पांडुरंगच्या पुराव्याप्रमाणे आरोपीने साक्षीदार क्र.१ पुजाला “तुझी मायची गांड, तुला बघुण घेतो, वरिष्ठाकंडे तुझी तक्रार करतो, तुला निलंबीत करतो” असा शिवीगाळ केला होता. साक्षीदार क्र.५ प्रकाशच्या पुराव्याप्रमाणे घटनेवेळी आरोपी आणि साक्षीदार क्र.१ पुजा दरम्यांन बाचाबाची झाली होती व त्यावेळी आरोपीने तिला “तुझी आयची गांड” असा शिवीगाळ केला होता.

[०९] वरनमुद पुराव्यातील गुणवत्ता किंवा इतरत्रकडे वळण्यापूर्वी याठिकाणी हे नमुद करणे गरजेचे आहे की, आरोपीच्या विद्वान विधीज्ञांनी मुख्यत्वेकरुन खबर दाखल करण्यास साक्षीदार क्र.१ पुजाला झालेल्या खुलाश्याशिवायच्या विलंबामुळे आरोपीस प्रस्तुत खटल्यातुन निर्दोष मुक्त करण्याची मागणी केली. सदर युक्तिवादाच्या प्रकाशात अभिलेखावरील पुराव्याचे अवलोकन केले असता, अभियोगपक्षाच्या खटल्या व पुराव्याप्रमाणे घटना ही दिनांक ०३/०३/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजता घडलेली आहे. परंतु, निशाणी क्र.१६ वरील खबर ही दिनांक १४/०३/२०१९ रोजी दाखल करण्यात आलेली आहे. म्हणजेच खबर ही जवळपास ११ दिवसांच्या विलंबाने दाखल करण्यात आलेली आहे. सदर विलंबाबाबतचा काहीएक मजकुर खबरीत नमुद नाही. परंतु, पुराव्यादरम्यांन साक्षीदार क्र.१ ने घटनेनंतर तिची नियुक्ती ही ईयत्ता दहावी बारावीच्या बोर्डाच्या परीक्षेकरीता असलेल्या बैठी पथकात करण्यात

आल्यामुळे खबर दाखल करण्यास विलंब झाल्याचे सांगितलेले आहे. मात्र सदर नेमणुकीबाबतचा आदेश तिने अभिलेखावर सादर केलेला नाही. सदरचे बैठी पथक हे निश्चीतच २४ तास काम करत नसेल. अशा परिस्थितीत तिने विलंबाबाबत दिलेले कारण स्वीकारण्याजोगे ठरत नाही. त्यामुळे याठिकाणी तिच्या पुराव्याचे काळजीपुर्वकरित्या अवलोकन करणे गरजेचे ठरते.

[१०] आरोपीच्या वतीने दुसरा बचाव हा पुर्ववैमनस्यामुळे साक्षीदार क्र.१ पुजाने खोटी खबर दिल्याचे आणि इतर साक्षीदारांनी तिच्या समर्थनार्थ पुरावा दिल्याचा युक्तिवाद केला. सदर युक्तिवादाच्या प्रकाशात अभिलेखाचे अवलोकन केले असता, साक्षीदार क्र.१ पुजा, साक्षीदार क्र.३ कमल, साक्षीदार क्र.४ पांडुरंग, साक्षीदार क्र.५ प्रकाश इत्यादींच्या विरुध्द मानहानीबाबतचा दावा दाखल केल्याचे आणि तो प्रलबिंत असल्याचे मान्य केलेले आहे. अशा परिस्थितीत निश्चीतच वरनमुद साक्षीदारांचा पुरावा हा फार काळजीपुर्वकरित्या हाताळावा लागेल.

[११] प्रस्तुतच्या खटल्याकामी महत्वाचा मुद्दा म्हणजे साक्षीदार क्र.१ पुजा, साक्षीदार क्र.३ कमल, साक्षीदार क्र.४ पांडुरंग, साक्षीदार क्र.५ प्रकाश यांनी त्यांच्या पुराव्यादरम्यांन नमुद केलेल्या शिव्या हया पुर्णतः सुधारणेच्या कक्षेत बसतात. निश्चीतच कायद्याच्या प्रस्थापीत नियमांप्रमाणे खबर किंवा प्रथम खबरी अहवाल हा विश्वकोष नसतो. परंतु, त्याच्या निश्चीतच असा अर्थ होत नाही की, खटल्याच्या मुळाशी जाणा–या व गुन्हयाचे घटक असलेल्या बाबीच त्यात यायला नको. शिव्या हया फक्त खबरीत नमुद नसत्या तरी इतर साक्षीदारांचा पुरावा विचारार्थ घेता आला असता, परंतु, इतर साक्षीदारांचा पुरावा देखील त्याबाबत सुधारणेच्या स्वरुपाचा असुन, त्यांच्या जबाबात त्यांनी कुठेही सदरच्या शिव्या नमुद केलेल्या नाहीत.

[१२] उपरोल्लेखीत केल्याप्रमाणे साक्षीदार क्र.१ पुजा, साक्षीदार क्र.३

कमल, साक्षीदार क्र.४ पांडुरंग, साक्षीदार क्र.५ प्रकाश हे अभियोगक्षाच्या खटल्याप्रमाणे घटनेचे प्रत्यक्षदर्शी साक्षीदार आहेत. परंतु, त्यांचा पुरावा देखील आरोपीने साक्षीदार क्र.१ पुजाला दिलेल्या शिव्यांबाबत सारखा दिसत नाही. त्यांनी सर्वांनी त्यांच्या पुराव्यात नमुद केलेल्या शिव्या हया वेगवेगळया आहेत. अशा सर्व परिस्थितीत एकुणच साक्षीदार क्र.१ पुजाला खबर दाखल करण्यास झालेला खुलाश्याशिवायचा विलंब, आरोपी व अभियोगपक्षाच्या साक्षीदारा दरम्यांन असलेले पुर्ववैमनस्य, प्रस्तुत गुन्हयातील आवश्यक घटकाबाबत अभियोगपक्षाच्या साक्षीदारांच्या पुराव्यादरम्यांनच्या सुधारणा व तफावती इत्यादी बाबींवरुन अभियोगपक्षास वरनमुद घटकांपैकी पहिला घटक शंकेपलीकडे जावुन सिध्द करण्यात अपयश आल्याचे स्पष्ट होते.

[१३] घटना ही सार्वजनिक ठिकाणी घडल्याची बाब सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने मुख्यत्वेकरुन साक्षीदार क्र.२ राजु, साक्षीदार क्र.६ दिपक आणि निशाणी क्र.१८ वरील घटनास्थळ पंचनाम्यावर विश्वास ठेवलेला आहे. सदर पुराव्यावरुन घटनास्थळ हे पंचायत समिती कार्यालय, गंगाखेड येथे असल्याची बाब स्पष्ट होते. त्यावरुन प्रस्तुत गुन्हयाकामी आवश्यक असलेला दुसरा घटक सिध्द होतो.

[१४] गुन्हयानुषंगे तिस–या घटकाचा विचार करता, अभियोगपक्षाच्या वतीने तपासण्यात आलेल्या प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांनी म्हणजेच साक्षीदार क्र.१ पुजा, साक्षीदार क्र.३ कमल, साक्षीदार क्र.४ पांडुरंग, साक्षीदार क्र.५ प्रकाश यांनी कोठेही त्यांना आरोपीच्या कृत्यामुळे त्रास झाल्याचा प्रत्यक्ष पुरावा दिलेला नाही. यात काहीएक शंका नाही की, सदरची बाब अभिलेखावरील इतर पुराव्याच्या प्रकाशात देखील अनुमानीत केली जावु शकते. निश्चीतच चार चौघांसमक्ष जर कोणी अश्लील भाषेत व खास करुन आई–बहिणीच्या नावावर शिवीगाळ केला, तर त्याचा त्रास स्वतः खबरी व त्याठिकाणी हजर असणा–या इतर स्त्री व पुरूष

वर्गास होऊ शकतो. परंतु, उपरोल्लेखीत केल्याप्रमाणे वरनमुद साक्षीदारांनी त्यांच्या पुराव्यात नमुद केलेल्या शिव्यांबाबतचा पुरावा हा पुर्णतः सुधारणायुक्त व तफावतीयुक्त असा आहे. त्यामुळे सदरच्या सुधारणायुक्त पुराव्यावर अवलंबुन राहुन आरोपीने अश्लील शिव्या दिल्याचा निष्कर्ष काढुन, वरनमुद साक्षीदारांना त्रास झाला असे गृहित धरता येणार नाही किंवा अनुमानीत देखील करता येणार नाही. म्हणजेच अभियोगपक्षास प्रस्तुत खटल्याकामी आवश्यक असलेला तीसरा घटक सिध्द करण्यात अपयश आल्याची बाब स्पष्ट होते.

[१५] वरनमुद विश्लेषणावरुन अभियोगपक्षास भारतीय दंड विधान, कलम २९४ अन्वयेच्या गुन्हयासाठी आवश्यक असणा−या तीन घटकांपैकी दोन घटक सिध्द करण्यात अपयश आल्याचे स्पष्ट होते. त्यामुळे विचारार्थ असलेल्या मुद्दा क्र.१ चा निष्कर्ष होकारार्थी स्वरुपात नोंदविण्यात येत असुन, मुद्दा क्र.२ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

## आदेश

**[०१]** आरोपी नामे वैश्वानरदेव संभाजीराव पवारची फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम २५५(१) अन्वये भारतीय दंड संहिता, कलम २९४ अन्वयेच्या दोषारोपातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**[०२]** त्याचा पुर्वीचा जामिन व जातमुचलका रद्द करण्यात येत आहे.

**[०३]** त्यास फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ४३७अ अन्वयेच्या पुर्ततेसाठी रुपये १५,०००/− जामिन व जातमुचलका सादर करण्याबाबत आदेशीत करण्यात येत आहे.

**[०४]** फौजदारी प्रक्रिया संहिता, कलम ३६५ प्रमाणे प्रस्तुत न्यायनिवाडयाची एक सत्यप्रत जिल्हादंडाधिकारी, परभणी यांना पाठविण्यात यावी.

**[०५]** मा. जिल्हादंडाधिकारी, परभणी यांनी न्यायनिवाडयाची सत्यप्रत खबरी नामे पुजा पांडुरंग गडमवाड, राहणार भाग्य नगर,

गंगाखेड, तालुका गंगाखेड, जिल्हा परभणी यांना पोहोच करुन, त्याबाबतची पोहोच या न्यायालयाच्या अभिलेखाकामी पाठवावी.

[०६] न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषीत करण्यात आला.

Digitally signed by PANKAJ MANMOHAN BIDADA
Date: 2026.07.17 17:00:58 +0530

**(पकंज म. बिदादा)**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
परभणी.

दिनांक :– १७/०७/२०२६.

## परिशिष्ट

## अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन साक्षीदारांची यादी

**अ. अभियोगपक्षाचे साक्षीदार :–**

| साक्षीदार क्रमांक | नाव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| **साक्षीदार क्र.१** | पुजा पांडुरंग गडमवाड | फिर्यादी |
| **साक्षीदार क्र.२** | राजु सुंदरराव घनसावंत | घटनास्थळ पंच |
| **साक्षीदार क्र.३** | कमल शिवाजी नागरगोजे | साक्षीदार |
| **साक्षीदार क्र.४** | पांडुरंग ज्ञानोबा मुरकुटे | साक्षीदार |
| **साक्षीदार क्र.५** | प्रकाश मुकूंदराव सोनवणे | साक्षीदार |
| **साक्षीदार क्र.६** | दिपक उत्तमराव भारती | तपास अधिकारी |

**ब. बचावपक्षाचे साक्षीदार :–** साक्षीदार तपासले नाही.

**क. न्यायालयीन साक्षीदार :–** साक्षीदार तपासले नाही.

## अभियोगपक्ष/बचावपक्ष/न्यायालयीन निशाणी लागलेल्या दस्तांची यादी

**अ. अभियोगपक्षाचे दस्त :–**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | दस्ताचे वर्णन |
|---|---|---|
| **०१** | निशाणी क्र.१६ | साक्षीदार क्र.१ पुजाने दिलेली खबर |
| **०२** | निशाणी क्र.१७ | प्रथम खबरी अहवाल |
| **०३** | निशाणी क्र.१८ | घटनास्थळ पंचनामा |

**ब. बचावपक्षाचे दस्त :–** नाही.

**क. न्यायालयीन दस्त :–** नाही.

**ड. भौतिक वस्तु :–** नाही.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by PANKAJ MANMOHAN BIDADA
Date: 2026.07.17 17:01:15 +0530

**(पकंज म. बिदादा)**
अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,
परभणी.

दिनांक :– १७/०७/२०२६.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this PDF file are same word to word, as per the original Judgment.

| | |
|---|---|
| Name of the Court | : Additional C.J.M., Gangakhed |
| Date of pronouncement | : 17/07/2026 |
| Judgment signed by the P. O. on | : 17/07/2026 |
| Judgment uploaded on | : 17/07/2026 |